सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन, पोलीस विभाग
पोलीस उप आयुक्त(अभियान)
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५८१८
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

# प्रेसनोट

दिनांक : - १८/०६/२०२६

बृहन्मुंबई शहर व उपनगरात बेस्टची बस सेवा अविरत सुरु ठेवणे आणि मुंबई शहराचा विद्युत पुरवठा अखंडीत राखणे हे अत्यावश्यक असून बेस्ट उपक्रमांतर्गत पुरविल्या जाणाऱ्या सेवा या अत्यावश्यक सेवांच्या वर्गवारीत येत असल्याने, प्रशासनाने कामगार संघटनांच्या पुकारलेल्या संपाच्या पार्श्वभुमीवर **"महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परीक्षण अधिनियम २०२३ (MESMA - मेस्मा)"** या कायद्वाअंतर्गत दिनांक १२/०६/२०२६ रोजीच्या अधिसुचनेच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने बेस्ट उपक्रमातील कार्यरत व कंत्राटी कर्मचाऱ्यांना संपावर जाण्यास कायदेशीर प्रतिबंध करण्यात आला असून सदरचा संप बेकायदेशीर ठरवण्यात आला आहे.

तरी आंदोलकांकडून बेस्ट उपक्रमाच्या बस व आस्थापना यांचे नुकसान करू नये तसेच इच्छुक कर्मचाऱ्यांना कर्तव्यावर जाण्यास रोखू नये. नमूद बेकायदेशीर कृत्य केल्यास संबधितांवर मुंबई पोलीस दलाकडून योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

* * *